क्र.मह/कार्या/एनएएल-१/रेखां/एसआर/१३२/२०१६
जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी
दिनांक :-२७/०६/२०१८.

वाचले :-

१) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ भाग-२ नियम १६.

२) महाराष्ट्र नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-१८१२/१५७ प्र.क्र.७१/१२ पुर्नबांधणी क्रमांक ३४/१२/नवि-१३ दिनांक २१ नोव्हेंबर २०१३.

३) या कार्यालयाकडील रेखांकन आदेश क्रमांक मशा.का.६/एल.एन.अे/एसआर/१३/१२ दिनांक ३०/०१/२०१३.

४) श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी यांचा या कार्यालयामध्ये प्राप्त अर्ज दिनांक २७/०९/२०१६.

५) नगररचनाकार रत्नागिरी यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र.रेखां/तात्पु/मौजे-चिखलगाव ता.दापोली/नररत्ना/१८७९ दिनांक ०९/१०/२०१७ अन्वये तात्पुरती मंजूरी शिफारस.

६) उपअधिक्षक,भुमी अभिलेख राजापूर यांचेकडील मो.र.नं. २४६/१७-११-२०१७ दिनांक २८/१२/२०१७ अन्वये रेखांकन मोजणी नकाशे.

७) नगरचनाकार रत्नागिरी यांचे पत्र जा.क्र.रेखां./अंतिम/मौजे-चिखलगाव ता.दापोली/गट नं.३९९/२३,२४,२५/नररत्ना/७६१ दिनांक ०३/०४/२०१८ अन्वये अंतिम मंजूरी शिफारस.

८) तहसिलदार दापोली यांचेकडील पत्र क्रमांक/एलएनए/कावि/५०९/१८ दिनांक १७/०४/२०१८.

९) भुखंडाचे विकास शुल्क रक्कम ५८,८००/- दिनांक २२/०६/२०१८ रोजी शासकीय खजिन्यात भरणा केलेली आहे.

प्रस्तावना:-

मौजे **चिखलगाव ता. दापोली जि. रत्नागिरी** येथील **गट क्रमांक ३९८ व ३९९ एकूण क्षेत्र १७८००.०० चौमी**. या जमिनीमध्ये निवासी भूखंडाचे रेखांकनास उपद्घोषातील संदर्भ क्र.३ अन्वये **श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी** यांना निवासी रेखांकनास परवानगी देण्यात आलेली आहे.

उपद्घोषातील संदर्भ क्र.२ अन्वये अल्प उत्पन्न गट (एलआयजी) व मध्यम उत्पन्न गट (एमआयजी) राखीव भूखंड तरतूद रद्द झाल्याने नियोजिलेले भूखंडाचे सर्वसाधारण भूखंडाचे नियोजन करुन मौजे **चिखलगाव ता. दापोली जि. रत्नागिरी** येथील **गट क्रमांक ३९९/२३, ३९९/२४, ३९९/२५** मधील **क्षेत्र २५२९.०० चौमी.** मध्ये **सुधारित रेखांकन** परवानगी मिळण्यास **श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी** यांनी अर्ज केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत

नियोजित रेखांकनाचा नकाशा गा.न.नं.७/१२ चा उतारा, फेरफार नोंदीचा उतारा मोजणी नकाशा इत्यादी कागदपत्र सादर केलेले आहेत. मौजे **चिखलगाव ता. दापोली जि. रत्नागिरी** येथील **गट क्रमांक ३९९/२३, ३९९/२४, ३९९/२५** मधील **क्षेत्र २५२९.०० चौमी. या मिळकतीचे श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी** हे कब्जेदार असून अन्य व्यक्तींचा हितसंबंध असल्याचे गा.न.नं.७/१२ चा उतारा पहाता दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणी नगर रचनाकार रत्नागिरी यांचे अभिप्राय घेण्यात आलेले असून त्यांचे पत्र **क्रमांक जा.क्र.रेखां/तात्पु/मौजे-चिखलगाव ता.दापोली/नररत्ना/१८७९ दिनांक ०९/१०/२०१७** अन्वये तात्पुरती शिफारसी अन्वये मंजूर केलेल्या रेखांकन नकाशाप्रमाणे **उपअधिक्षक भूमि अभिलेख दापोली** यांनी प्रत्यक्ष मोजणी करुन नियोजित रेखांकनातील भूखंडाची क्षेत्र निश्चित केली असून त्याप्रमाणे **मो.र.नं. २४६/१७-११-२०१७ दिनांक २८/१२/२०१७** नुसार तयार केलेले रेखांकन अंतिम मोजणी नकाशा अर्जदार यांनी या कार्यालयाकडे हजर केला आहे. प्रत्यक्ष मोजणीत **२५२९.०० चौ.मी.** इतके असल्याचे दिसून आले आहे. तेवढया क्षेत्राचा मोजणी नकाशा त्यांनी तयार केलेला आहे. त्यानंतर नगररचनाकार रत्नागिरी यांनी त्यांचेकडील **जा.क्र.रेखां./अंतिम/मौजे-चिखलगाव ता.दापोली/गट नं.३९९/२३,२४,२५/नररत्ना/७६१ दिनांक ०३/०४/२०१८** अन्वये रेखांकनास अंतिम मंजूरी दिलेली आहे.

तहसीलदार दापोली यांनी **मंडळ अधिकारी बुरोंडी** यांचे मार्फत चौकशी केली असता सुधारित रेखांकनास परवानगी देणेस हरकत नसलेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

जमिन भूसंपादनाखाली येत नसल्याबाबत **उपविभागीय अधिकारी दापोली** यांचेकडील पत्र क्र./भूसं/नाहरकत/एसआर/२१७/२०१८ दिनांक ०९/०३/२०१८ रोजीचा नाहरकत दाखला प्रकरणी सामिल आहे.

जमिन पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अथवा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग रत्नागिरी,यांजकडील पत्र जा.क्र.पाप्रबांविचि/प्रशा/का-२५/१०९० सन २०१८ दिनांक १८/०३/२०१८ अन्वये नाहरकत दाखला दिला आहे.

दापोली तालुक्यामधील जमिन पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अथवा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) रत्नागिरी यांनी जा.क्र/पुनर्वसन/कार्या-३१/२०१५ दिनांक १६/०३/२०१५ अन्वये कळविलेल्या बाधित/लाभक्षेत्रातील गांवाच्या यादीमध्ये **मौजे चिखलगाव** हे गांव समाविष्ट नाही.

आदेश

मौजे **चिखलगाव ता. दापोली जि. रत्नागिरी** येथील **गट क्रमांक ३९९/२३, ३९९/२४, ३९९/२५** मधील **क्षेत्र २५२९.०० चौमी.** चे प्रत्यक्ष रेखांकन मोजणीनुसार जमिन मालक अर्जदार **श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी** यांनी केलेल्या निवासी रेखांकन भुखंडास सोबत जोडलेल्या परिशिष्ट प्रमाणे तसेच अटी व शर्तीचे अधिनतेने मंजूरी देण्यात येत आहे.

०१) रेखांकनाचा भूखंडाचा वापर केवळ निवासी प्रयोजनासाठी करणेचा आहे. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर बदलावयाचा झाल्यास या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे जरुरीचे आहे.

०२) भूखंडाची उपविभागणी करावयाची झाल्यास महसूल खात्याची परवानगी घेणे आवश्यक आहे.

०३) रेखांकनातील भूखंडामध्ये बांधकाम करणेपूर्वी इमारत विषयक तपशिलवार बांधकाम नकाशे **सक्षम प्राधिकारी** यांचेकडून मंजूर करुन घेणे संबंधित भूखंडधारकावर बंधनकारक आहे.

०४) नियोजित रेखांकनातील भूखंडाजवळून महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाची उच्च दाबाची विदयुत वाहिनी जात असल्यास सदरच्या विदयुत वाहिनीपासून १५ मीटर पेक्षा कमी अंतरावर इमारतीचे बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

०५) नियोजित केलेल्या भूखंडात प्रस्तावित केलेले रेखांकना संदर्भात वर उल्लेखिलेल्या शर्तीची पूर्तता करणेत आले नंतरच भूखंडधारकांना सक्षम प्राधिकारी यांचेकडून बांधकाम परवानगी अनुज्ञेय राहील. या आदेशाने देण्यात आलेली रेखांकन मंजूरी व बिनशेती परवागनी म्हणजे नियोजित भूखंडात बांधकामे अनुज्ञेय असे नसून भूखंड धारकांनी स्वतंत्ररित्या बांधकाम नकाशे मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

०६) सदर जमिनीतील वृक्षांची तोड असल्यास करावयाची झाल्यास अर्जदारांना सक्षम वन/महसुल अधिका-यांच्या पूर्वपरवानगी कायदयाने बंधनकारक राहील.तसेच वाहतुक परवाना वन अधिका-यांकडून घेणे बंधनकारक राहील.

०७) सदर जागेत अनधिकृतरित्या गौणखनिज उत्खनन करण्यास अर्जदार यांना मनाई आहे.कायदयानुसार आवश्यक त्या परवानग्या घेणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.

०८) अर्जदार यांचेवर प्रचलित पर्यावरण आरोग्य व तत्सम कायदयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

०९) रेखांकनातील अंतर्गत रस्ते,खुले क्षेत्र वगळता प्रस्तावित उपभूखंड वापर फक्त निवासी कारणासाठी करता येईल.

१०) रेखांकनातील रस्ते हे आजूबाजूच्या भूखंडधाकरकाला वापरण्यासाठी खुले करुन देणे अर्जदारास बंधनकारक असून त्याचे स्वरुप सार्वजनिक आहे.

११) रेखांकनातील अंतर्गत रस्ते पूर्णपणे विकासित केल्याशिवाय भूखंडाची विक्री करता येणार नाही.आणि याबाबत कोणतीही तक्रार उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहिल.

१२) नियोजित रेखांकन अथवा रेखांकनातील पोचमार्ग वर्गीकृत रस्त्यासन्मुख असलेस आवश्यक असल्यास संबंधित महामार्ग प्राधिकरणाची परवानगी घेणे अर्जदारास बंधनकारक राहिल.

१३) सदर भुखंडास हमरस्त्यापासुन जोडणारा पोचमार्ग अर्जदारांनी संपुर्णतः विकसित करणे आवश्यक राहील.सदर पोचमार्ग अन्य जमीन मालकांच्या जमिनीतून जात असलेस त्याबाबत संबधितांची संमती घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

१४) रेखांकनातर्गत रस्ते तसेच ग्रामिण मार्गाकरिता रेखांकनातून नियोजिलेल्या रस्ता रुंदीकरणा खालील क्षेत्र स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत झाल्याशिवाय रेखांकनातील भूखंडामध्ये विकास अनुज्ञेय होणार नाही.

१५) रेखांकनातील खुल्या क्षेत्राचा वापर सार्वजनिक कारणासाठी रेखांकनातील भूखंड धारकांचा प्रथम हक्क राहील. रेखांकनातील मोकळे क्षेत्रात १० टक्के बांधकाम करावयाचे असल्यास या कार्यालयाची पूर्व परवानगी आवश्यक राहील.

१६) या कार्यालयाकडील रेखांकन आदेश क्रमांक मशा.का.६/एल.एन.अे/एसआर/१३/१२ दिनांक ३०/०१/२०१३ अन्वयेच्या अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

१७) अर्जदार यांनी मंजूर रेखांकनातील भूखंड विक्री केली असून त्याबाबत संबंधिताकडून कोणतीही बाधा येणार नाही याची अर्जदार यांचेवर जबाबदारी राहील.

१९) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास अगर मंजूर रेखांकनात फेर बदल केलेचे आढळून आल्यास देणेत आलेली परवागनी आपोआप रद्द होईल.

सही/-
(बाबासाहेब बेलदार)
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

प्रत -

१) **श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी** यांजकडे मंजूर रेखांकन नकाशासह.

२) **तहसीलदार दापोली** यांजकडे मंजूर रेखांकन नकाशासह योग्यत्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

३) **तलाठी सजा नानटे** यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना

४) **उपअधिक्षक,भूमि अभिलेख दापोली यांजकडे मंजूर रेखांनासह रवाना.**

२/- सदरच्या मंजूर रेखांकन नकाशाप्रमाणे दुरुस्त आकारफोड पत्रक तयार करावे गट क्रमांक ३९९/२३, ३९९/२४, ३९९/२५ चे इतर हक्कामधील एलआयजी व एमआयजी नोंद रद्द करणेत यावी व त्याचा अंमल गांव कागदी देण्यासाठी तहसीलदार दापोली यांजकडे पाठविण्यात यावे.

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी करीता

परिशिष्ट

मौजे चिखलगाव ता.दापोली जि. रत्नागिरी येथील गट क्रमांक ३९९/२३, ३९९/२४, ३९९/२५ मधील क्षेत्र २५२९.०० चौमी. या जमिनीमध्ये निवासी भूखंडाचे उपअधिक्षक भूमी अभिलेख दापोली यांजकडील मो.र.नं. २४६/१७-११-२०१७ दिनांक २८/१२/२०१७ चे ब प्रतीनुसार रेखांकनातील क्षेत्राचा तपशिल दर्शविणारे पत्रक.

अ.क्र.	स.नं.	हि.नं.	क्षेत्र (चौमी)	भूखंड क्र.
१	३९९	२३/१	२४६.००	१
२		२३/२	२४६.००	२
३	३९९	२४/१	१७२.००	१
४		२४/२	१७२.००	२
५		२४/३	१७४.००	३
६		२४/४	१७४.००	४
७		२४/५	१७४.००	५
८		२४/६	१७१.००	६
९	३९९	२५/१	२३८.००	१
१०		२५/२	२००.००	२
११		२५/३	२०१.००	३
१२		२५/४	२०१.००	४
१३		२५/५	१६०.००	५
एकूण क्षेत्र			२५२९.००	

सही / -
(बाबासाहेब बेलदार)
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी करीता

अपर जिल्हा
रत्नागि

या अर्जा कामी केलेल्या चौकशीत असे आढळून येते की,

१) सदर जमीनीचा अर्जदार स्वतः वहिवाटधारक आहे.

२) सदर जमिन विभागीय-विकास योजनेत किंवा नगर विकास योजनेत कोणत्या विशिष्ट कारणासाठी राखून ठेवलेली नाही आणि संबंधित अधिका-यांकडून सदर जमिन निवासी वापरास अनुज्ञेय असल्याबाबत नगररचनाकार रत्नागिरी यांनी अहवाल क्रमांक **जा.क्र.रेखां/तात्पु/मौजे-चिखलगाव ता.दापोली/नररत्ना/१८७९ दिनांक ०९/१०/२०१७ अन्वये शिफारस केली आहे.**

३) निवासी रेखांकन अकृषिक कारणासाठी उपयोगात आणण्यास स्वच्छता व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टितून सदर जमीन योग्य आहे.

४) **नगर रचनाकार** यांचा चौकशी अहवाल **जा.क्र.रेखां./अंतिम/मौजे-चिखलगाव ता.दापोली/गट नं.३९९/२३,२४,२५/नररत्ना/७६१ दिनांक ०३/०४/२०१८** नुसार सदर प्रकरणी प्रस्तावित बिनशेती वापर अनुज्ञेय आहे.

५) अर्जदाराने हजर केलेला आराखडा-इमारतीचा नकाशा महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या उपयोगाचे रुपांतर व बिनशेती दस्त) नियम १९६९ समवेत जोडलेल्या परि.२ व ३ मधील तरतुदीशी सुसंगत आहे.

६) जमिन भूसंपादनाखाली येत नसल्याबाबत **उपविभागीय अधिकारी दापोली** यांचेकडील पत्र क्रमांक/भूसं/नाहरकत/एसआर/२१७/२०१८ दिनांक ०९/०३/२०१८ रोजीचा नाहरकत दाखला प्रकरणी सामिल आहे.

७) जमिन पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अथवा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत उपकार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग रत्नागिरी,यांजकडील पत्र जा.क्र.लपाविचि /प्रशा/का-२५/१०९० दिनांक १८/०३/२०१८ अन्वये नाहरकत दाखला दिला आहे.

८) **दापोली** तालुक्यामधील **मौजे चिखलगाव** मधील जमिन पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अथवा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) रत्नागिरी यांजकडील पत्र क्रमांक पुनर्वसन/कार्या-१/कावि ३१/२०१५ दिनांक १६/०३/२०१५ अन्वये या कार्यालयामध्ये कळविले आहे

९) **तहसिलदार दापोली** यांचेकडील पत्र **क्रमांक/एलएनए/कावि/५०९/१८ दिनांक १७/०४/२०१८** ने झालेला चौकशी अहवालानुसार सुधारित रेखांकन परवानगी देणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

आदेश

सबब जिल्हाधिकारी यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील ४४ व्या कलमानुसार प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन अर्जदार **श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी यांना मौजे चिखलगाव ता. दापोली जि. रत्नागिरी** येथील **गट क्रमांक ३९९/२३, ३९९/२४, ३९९/२५** मधील **क्षेत्र २५२९.०० चौमी. या जमिनीमध्ये निवासी-रेखांकन** या अकृषिक कारणासाठी वापर करणेस याव्दारे खालील शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) **एकूण २५२९.०० चौ.मी. क्षेत्र नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे निवासी रेखांकनासाठी वर्ग करणेचे आहे.**

२) देण्यात येत असलेली परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्यासाठी केलेल्या नियमांतील तरतुदीच्या आधिन राहून देण्यांत येत आहे.

३) रेखांकनातील भूखंडामध्ये बांधकाम करणेपूर्वी इमारत विषयक तपशिलवार बांधकाम नकाशे महसूल खात्याकडून मंजूर करून घेणे संबधीत भूखंडधारकावर बंधनकारक आहे.

४) ज्या कारणाकरीता परवानगी देण्यात आली आहे त्या कारणाकरिताच सदर जमिनीचा उपयोग करावा. त्या क्षेत्राचा किंवा त्यापैकी काही भागाचा परवानगी देण्यात आलेल्या कारणा व्यतिरिक्त इतर कारणासाठी वापर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता कामा नये.

५) परवानाधारकाने इमारतीचा आराखडा सक्षम अधिका-याकडून जेथे इमारतीचे नियंत्रण ज्याचे अधिक्षेत्रात येत असेल तेथे मंजूर करुन घेतला पाहीजे आणि इतर प्रकरणात त्यांने इमारती आराखडे महाराष्ट्र जमिन महसूल नियम (जमिनीच्या उपयोगाचे रुपांतर आणि बिनशेती दस्त) १९६९ मधील परिशिष्ट २ व ३ मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करुन तयार केले पाहीजेत आणि ते जिल्हाधिकारी यांचेकडून मंजूर करुन घेतले पाहिजेत व मंजूर आराखडयानुसार बांधकाम केले पाहीजे.

६) या करिता परवानगी देण्यात आली आहे त्या कारणाकरिता सदर जमिनीचा निवासी रेखांकनाचा उपयोग आदेशाच्या तारखेपासून परवानगीधारकाने दर चौ.मी.**१०**पैसे. या दराने **२५२९.०० चौ.मी.** क्षेत्राची निवासी बिनशेती दस्त दिला पाहिजे जमिनीचा उपयोगात बदल केल्यास बदल होते वेळी जरी पूर्वी आकारण्यात आलेल्या बिनशेती दस्ताची मुदत संपली नसली तरी ते शासनाकडून वेळोवेळी सुधारणा केलेल्या दराप्रमाणे भरणे बंधनकारक राहिल.

७) नियोजित केलेल्या भूखंडात प्रस्तावित केलेल रेखांकन संदर्भात वर उल्लेखिलेल्या शर्तीची पूर्तता करणेत आले नंतरच भूखंड धारकांना महसूल खात्याकडून बांधकाम परवानगी अनुज्ञेय राहील. या आदेशान्वये देण्यांत आलेली रेखांकन मंजूरी व बिनशेती परवानगी म्हणजे नियोजित भूखंडात

बांधकामे अनुज्ञेय असा नसून भूखंड धारकांनी स्वतंत्ररित्या बांधकाम नकाशे मंजूर करून घेणे आवश्यक आहे.

८) बिनशेती दस्ताची **३१/७/२०१६** रोजी संपणा-या मुदतीकरीता किंवा शासन वेळोवेळी देईल त्या आदेशानुसार हमी राहील. त्यानंतर कोणत्याही सुधारीत दरानुसार बिनशेती दस्त दुरुस्तीसाठी सुधारण्यास पात्र राहील.

९) जर परवानगीधारकाने या आदेशातील अटी विरुध्द कृती केली तर **जिल्हाधिकारी** हे अधिनियमानुसार त्यास होणा-या इतर शिक्षेस बाधा न आणता ते आदेश देतील त्याप्रमाणे परवानगीधारकाने दंड आणि दस्त भरल्यावर सदर जागा ठिकाण अर्जदार ताब्यात ठेऊ शकतील.

१०) जागेवर रेखांकनाच्या मालकी हक्क,हददीबाबत व पोहच रस्त्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची व इजमेंट राईट बाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

११) सदर भुखंडास हमरस्त्यापासुन जोडणारा पोचमार्ग अर्जदारांनी संपुर्णतः विकसित करणे आवश्यक राहील.सदर पोचमार्ग अन्य जमीन मालकांच्या जमिनीतून जात असलेस त्या बाब संबंधितांची समंती घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. सदर आवश्यक रुंदीचा रस्ता ग्रामपंचायतीचे ताब्यात असणे आवश्यक राहील.

१२) पोचमार्गाबाबत वा अन्य तत्सम बाबीबाबत कोणताही कायदेशिर प्रश्न उपस्थित झालेस त्यांची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.(तसे अर्जदारानी क्षतिपूर्ती बंधपत्र या कार्यालयामध्ये सादर केलेले आहे.)

१३) परवानगीधारकाने या आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत जमिनीच्या बिनशेती उपयोग सुरु केला पाहीजे.वेळोवेळी सदरची मुदत २ वर्षापर्यत वाढवून घेतल्याशिवाय बिनशेती उपयोग सुरु केल्यास सदर परवानगी रद्द झालेने मुदतीनंतर सुरु केलेला बिनशेती वापर अनधिकृत वापर म्हणून कारवाईस पात्र ठरेल.

१४) परवानगीधारकाने जमिनीचा उपयोग बिनशेतीकडे सुरु केल्यापासून दोन वर्षाचे आंत मंजूर सक्षम प्राधिकारी यांचेकडून इमारत बांधकाम परवानगी घेऊन त्याप्रमाणे इमारत बांधणे आवश्यक आहे ही मुदत जिल्हाधिकारी हे परवानगीधारकाने शासकीय आदेशानुसार बसविलेला दंड भरल्यावर त्यांना आवश्यक वाटल्यास वाढवून देऊ शकतील.

१५) या कार्यालयाकडील रेखांकन आदेश क्रमांक मशा.का.६/एल.एन.अे/एसआर/१३/१२ दिनांक ३०/०१/२०१३ मधील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

१६) उपरोक्त अटीना अधिन राहून रेखांकनातील भूखंडातील विकास विषयक परवानगी अनुज्ञेय राहिल.

१७) अर्जदारांनी सादर केलेले कागदपत्र चुकीचे अथवा दिशाभूल करणारे असल्याचे आढळून आल्यास सदर परवानगी रद्द होईल व होणा-या संभाव्य कायदेशीर कारवाईस अर्जदार जबाबदार राहतील.

सही/-
(बाबासाहेब बेलदार)
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

प्रति,

१) **श्री. अतुल रमेश नवले रा. चिखलगाव ता.दापोली जि.रत्नागिरी** यांजकडे मंजूर रेखांकन नकाशासह यांच्याकडे मंजूर रेखांकनासह.

२) **तहसीलदार दापोली** यांचेकडे पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी

३) **उपअधिक्षक,भूमि अभिलेख दापोली** यांजकडे कमी जास्त पत्रकासाठी मंजूर रेखांकनासह.

४) **तलाठी सजा नानटे** यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी.

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी करीता